**विषय :-** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०२२ मध्ये सुधारणा करण्याबाबत.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५७ (३) नुसार महानगरपालिकेने शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रारुप सेवाप्रवेश नियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.भिनिम-२०२२/प्र.क्र./९४/नवि-२३, दि.१४/१२/२०२२ नुसार भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ या नियमास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५४, ४५५, ४५६, ४५७ (३), व ४६५ अन्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापी, उक्त प्राप्त भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ मधील विविध १७ पदांबाबत सन्मा.पदाधिकारी, लोप्रतिनिधी, विविध कर्मचारी संघटना व महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत काही अधिकारी व कर्मचा-यांकडून हरकती घेण्यात आल्यानंतर उक्त पदांमधील आवश्यक दुरुस्तीकामी प्रस्ताव शासनास या कार्यालयाकडील जा.क्र./भिनिशमनपा/ आस्थापना/३०४२/२०२३, दि.१३/०९/२०२३, अन्वये पाठवण्यात आलेला होता.

तदनंतर, त्याअनुषंगाने उक्त सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार प्रशासकीय ठराव क्र.२८१ दि.२५/१०/२०२३ पारित करून शासनास सादर करण्यात आलेला होता.

शासनास उक्त जा.क्र./भिनिशमनपा/आस्था./३०४२/२०२३, दि.१३/०९/२०२३, नुसार पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०२२ मधील सदर १७ पदांमध्ये दुरुस्ती, सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सविस्तर कारणमिमांसा, अशा प्रकारची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, प्रशासकीय सोईच्या दृष्टीने असणारी गरज इत्यादी बाबत अहवाल सादर करण्याबाबत मा.अवर सचिव, नगरविकास विभाग यांचेकडील प्राप्त पत्र क्र.भिनिम-२०२२/प्र.क्र.९४/नवि-२३, दि.२७/१२/२०२३, च्या अनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा अहवाल या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र./भिनिशमनपा/ आस्थापना/६१२/२०२४ दि.२१/०२/२०२४ व **प्रशासकीय ठराव क्र.३६६, दि.२१/०२/२०२४** अन्वये वरिष्ठ लिपीक व लिपीक या संवर्गामध्ये आवश्यकत्या दुरूस्ती करून प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला होता.

मात्र, भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०२२ मध्ये सुधारणा करण्याकामी प्रशासकीय ठाराव क्र. २८१, दि.२५/१०/२०२३ व प्रशासकीय ठराव क्र.३६६, दि.२१/०२/२०२४ या दोन्ही प्रशासकीय ठराव हे परस्परांशी विसंगत असल्यामुळे प्रशासकीय ठराव क्र. ६९० दि. २७/११/२०२४ अन्वये विखंडित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. पंरतू ठराव विखंडित करण्या ऐवजी ठराव रद्द करणे आवश्यक असल्याने ठराव क्र. ६९० दि. २७/११/२०२४ मध्ये फेरबदल अथवा सदर ठराव रद्द करणे आवश्यक आहे. तथापी सदर प्रशासकीय ठराव दि. २७/११/२०२४ रोजी पारित करण्यात आलेला असल्याने महानगरपालिका अधिनियमातील सन १९४९ मध्ये अनुसूची मधील, प्रकरण २ महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती, इत्यादीचे कामकाज मध्ये १.(र) **"महानगरपालिकेने पारित केलेल्या कोणत्याही ठरावात, तो पारित झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत फेरबदल करता येणार नाही किवा तो रद्द करता येणार नाही. मात्र, अशा ठरावात एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक-द्वितीयांश पालिका सदस्यांनी किंवा कोणत्याही विवक्षित बाबतीत, या अधिनियमान्वये आवश्यक असेल अशा अधिक संख्येइतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सभेत संमत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल;** यानुसार प्रशासकी ठराव रद्द/फेरबदल करण्यासाठी लागणारा कालावधी पाहता त्यास ३ महिने इतका कालावधी पुर्ण

झालेला नसल्याने प्रशासकीय ठराव क्र. ६९० दि. २७/११/२०२४ तुर्तास रद्द फेरबदल करता येणार नाही. यास्तव सदर ठराव उक्त कालावधी उलटल्यानंतर रद्द करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही प्रस्तावित करणे संयुक्तिक होईल. त्यामुळे प्रशासकीय ठराव क्र. ६९० दि. २७/११/२०२४ मध्ये विखंडित हा शब्द असल्याने लोकप्रतिनिधी व कर्मचारी संघटना यांचे मागणीनुसार व या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने **भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०२२ मध्ये सुधारणा करण्याकामी प्रशासकीय ठराव क्र. २८१, दि.२५/१०/२०२३ रोजीचा ठराव कायम ठेवणेबाबत तसेच प्रशासकीय ठराव क्र.३६६, दि.२१/०२/२०२४ हा ठराव रद्द करणेकामी** प्रस्तावित करण्यात येत असून उक्त प्रस्तावास सद्यःस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) नुसार प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकीय ठराव क्रमांक** 428 **दिनांक** 26/०१/२०२५

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा मंजूर सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२२ मध्ये सुधारणा करणेकामी सादर करण्यात आलेला प्रशासकीय ठराव क्र.२८१ दि.२५/१०/२०२३ व प्रशासकीय ठराव क्र.३६६, दि.२१/०२/२०२४ या दोन्ही प्रशासकीय ठरावामध्ये विसंगती असल्याने **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा मंजूर सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२२ मध्ये सुधारणा करणेकामी प्रशासकीय ठराव क्र. २८१, दि.२५/१०/२०२३ रोजीचा ठराव कायम ठेवणेबाबत तसेच प्रशासकीय ठराव क्र.३६६, दि.२१/०२/२०२४ रद्द करणेकामी** सद्यःस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-१) नवि-१४, दि.०६/०६/२०२२, अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च कलम ४५२ अ (१) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निमामपूर शहर महानगरपालिका** याद्वारे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**